# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY

(Formerly University of Pune)

**Website: www.unipune.ac.in, E-mail Id.:ar.coordination@pun.unipune.ac.in, coe@unipune.ac.in, Phone No.: 020-25621440**

**परिपत्रक क्र.-४४६-/२०२५**

**विषय : उच्च शिक्षण घेणा-या दिव्यांग विद्यार्थ्यांना तसेच वैद्यकीय कारणास्तव पात्र विद्यार्थ्यांना परीक्षेमध्ये सोयी-सवलती देणेबाबत.**

**संदर्भ :** १) विद्यापीठ परिपत्रक क्र.११४/२०१७, जा.क्र.परीक्षा/समन्वय/३१३, दिनांक १४.०३.२०१७.

२) मा.सचिव, विद्यापीठ अनुदान आयोग यांचे संदर्भ क्र. **F.No.6-2/2013(SCT)**, दिनांक १४.०१.२०१९ चे पत्र.

३) विद्यापीठ परिपत्रक क्र.२९६/२०२०, जा.क्र.परीक्षा/समन्वय/४८३२, दिनांक १७.११.२०२०.

४) परीक्षेसंदर्भातील महत्वाच्या सूचना जा.क्र.समन्वय/७४८, दिनांक २०.०९.२०२५.

उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संदर्भ क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.३०२/विशि-३, दिनांक ०४.०३.२०१७ अन्वये दिव्यांग विद्यार्थ्यांना परीक्षेमध्ये सोयी-सवलती देणेबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. सदर शासन निर्णयाबाबत यापूर्वीच उपरोक्त संदर्भ क्र.०१ व ०३ अन्वये सर्व संलग्नित महाविद्यालयांना अवगत करण्यात आलेले आहे. तसेच याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाकडूनही संदर्भ क्र.०२ अन्वये मार्गदर्शक सूचना प्राप्त झालेल्या आहेत. दिनांक ०४.०३.२०१७ रोजीच्या शासन निर्णयाची प्रत व उपरोक्त संदर्भ क्र.०२, ०४ च्या प्रती या परिपत्रकासोबत अवलोकनार्थ जोडल्या आहेत.

वैद्यकीय कारणास्तव पात्र विद्यार्थ्यांना उपरोक्त संदर्भ क्र.४ मधील अनु.क्र.९ च्या तरतूदी लागू राहतील.

सबब, या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, विद्यापीठ मान्यताप्राप्त सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षांकरिता उपरोक्त संदर्भ क्र.०४ अन्वये निर्गमित सूचना, विद्यापीठ अनुदान आयोगाकडून प्राप्त मार्गदर्शक सूचना आणि दिनांक ०४.०३.२०१७ च्या शासन निर्णयातील तरतूदींची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

सर्व संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी सदर परिपत्रक विद्यार्थी, शिक्षक व इतर सर्व संबंधित घटकांच्या निदर्शनास आणून द्यावे.

परीक्ष समन्वय कक्ष, परीक्षा विभाग
गणेशखिंड, पुणे ४११ ००७.
जा.क्र.-३१८९--, दिनांक : ०3.१२.२०२५

(प्रा.डॉ.प्रभाकर देसाई)
**प्रभारी संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

**प्रति,**

**मा.प्राचार्य/मा.संचालक, सर्व संबंधित संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था**
**पुणे जिल्हा, अहिल्यानगर जिल्हा, नाशिक जिल्हा व दादरा आणि नगर हवेली केंद्रशासित प्रदेश**

**प्रत माहितीसाठीः**

१) मा.प्रभारी अधिष्ठाता, सर्व विद्याशाखा, प्रस्तुत विद्यापीठ.
२) कुलगुरु कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) प्र-कुलगुरु कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
४) उपकुलसचिव, छाननी व तालिनीकरण कक्ष, परीक्षा विभाग.
५) उपकुलसचिव, गोपनीय व बारकोड कक्ष, परीक्षा विभाग.
६) उपकुलसचिव, गोदाम कक्ष, परीक्षा विभाग.

**उच्च शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांना परिक्षेमध्ये सोयी-सवलती देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०१६/प्र.क्र. ३०२/विशि-३**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ०४ मार्च, २०१७.

**प्रस्तावना:-**

राज्यातील सर्व उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थामध्ये विशेष गरजा असणाऱ्या (दिव्यांग) विद्यार्थ्यांचे अध्ययन, अध्यापन व मुल्यमापनाची पध्दती वेगळी असणे आवश्यक आहे. विषेश गरजा असणाऱ्या (दिव्यांग) विद्यार्थ्यांना शैक्षणिक मुल्यमापनामध्ये गरजेनुरूप सोयी सवलती देण्यासंदर्भात धोरण निश्चितीसाठी शासन स्तरावरुन समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीच्या बैठकीमध्ये सर्व अकृषी विद्यापीठाचे परिक्षा नियंत्रक व दिव्यांगांशी संबंधीत असलेल्या विविध संस्थांचे तज्ञ प्रतिनिधी उपस्थित होते. सदरहू बैठकीमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणामध्ये येणाऱ्या अडचणी व परिक्षा पध्दतीमध्ये त्यांना दिल्या जात असलेल्या व आवश्यक असलेल्या सोयी सुविधांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली व त्यानुसार आवश्यक त्या सूचना व अभिप्राय मागविण्यात आले. प्राप्त अभिप्राय व सूचनांचा विचार करून उच्च शिक्षण/विद्यापीठीय शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांना सोयी-सुविधा देण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते. त्यानुसार खाली नमूद केल्याप्रमाणे शासन निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय:-**

विशेष गरजा असणाऱ्या (दिव्यांग) विद्यार्थ्यांची खालीलप्रमाणे वर्गवारी आहे.

१. पूर्णत: अंध (Blindness)
२. अंशत: अंध (Low vision/ Partial Blind)
३. कुष्ठरोग निवारित ( Leprosy Cured Persons)
४. कर्णबधिर (Hearing Impairment - deft and hard of hearing )
५. लोकोमोटर डिसेबिलिटी अस्थिव्यंगासह (Locomotor Disability including Orthopedic disability)
६. शारिरीक वाढ खुंटणे (Dwarfism)
७. बौध्दिक अक्षम (मतिमंद/गतिमंद) (Intellectual Disability -Mentally challenged/Slow Learners)
८. मानसिक आजार (Mental Illness)
९. स्वमग्न (Autism Spectrum Disorder)
१०. सेरेब्रल पाल्सी (Cerebral palsy)
११. स्नायुंची विकृती (Muscular Dystrophy)
१२. मज्जासंस्थेचे तीव्र आजार (Chronic Neurological Conditions)
१३. अध्ययन अक्षम (Specific Learning Disabilities)
१४. बहुविध द्धन अपदयरर (Multiple Sclerosis)
१५. भाषण (वाचा) व भाषा अक्षमत्व (Speech and Language Disability)
१६. थॅलस्सेमिया (Thalassemia)/ कॅन्सर (Cancer)
१७. हिमोफिलिया (Hemophilia)
१८. सिकल सेल आजार (Sickle Cell Disease)
१९. बहुविकलांग (Multiple Disabilities)

२०. ॲसिड ॲटॅक व्हिक्टीम (Acid Attack Victim)

२१. पार्किंसन्स आजार (Parkinson's disease)

**(१) उपरोक्त सर्व प्रकारातील उच्च शिक्षण संस्थांमधील/ विद्यापीठ स्तरावरील शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांना खालील नमूद समान सोयी-सुविधा व सवलती उपलब्ध करुन देण्यात याव्यात :-**

अ) विद्यार्थ्यांच्या सोयीनुसार जवळचे परीक्षा केंद्र देय राहील. (शक्यतो विद्यार्थी ज्या महाविद्यालयामध्ये शिक्षण घेत आहे तेच महाविद्यालय किंवा त्याच्या घराजवळचे महाविद्यालय परिक्षाकेंद्र असावे) सर्व प्रकारच्या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका पी.डब्ल्यू.डी. शिक्का मुद्रित करुन तपासणी करिता वेगळया ठेवण्याची व्यवस्था करावी.

ब) विद्यार्थ्यांना सर्व प्रकारच्या परीक्षेच्या (Internal, External, Practical) प्रश्नपत्रिका सोडविण्यासाठी प्रति तास २० मिनिटे अधिक वेळ देय राहील.

क) अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना सत्रातील प्रत्येक परीक्षेमध्ये लेखी, तोंडी, प्रात्यक्षिक, अंतर्गत व प्रकल्प संशोधन परिक्षेमध्ये एकूण गुणांच्या ३ टक्के गुणांची सवलत एकाच विषयामध्ये किंवा सर्व विषयांमध्ये विभागून देण्यात यावी.

ड) परिक्षेसाठी विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचे प्राचार्य/संचालक यांचे पूर्व परवानगीने लेखनिक घेता येईल. मात्र लेखनिकांची व्यवस्था पालकांनी महाविद्यालयाचे सहकार्याने करावी अन्यथा शक्य झाल्यास महाविद्यालयाने लेखनिकांची यादी ठेवावी व या यादीतून लेखनिक देण्यात यावा. यासाठीचा पत्रव्यवहार परिक्षा आवेदनपत्र सादर करतेवेळी करण्यात यावा. आवश्यकतेनुसार सांकेतिक भाषा विश्लेषक (Sign Language Interpreter) उपलब्ध करुन द्यावा.

इ) जे विद्यार्थी आरोग्य व शारीरिक शिक्षण, समाजसेवा, बालवीर /वीरबाला/ छात्रसेना (N.C.C.) संरक्षण अभ्यास (Defence Studies) / मुलकी संरक्षण व रस्ता सुरक्षा गस्त (Civil Defence and Road Safety Patrol) इत्यादी विषय पूर्ण करु शकत नाहीत, त्या विद्यार्थ्यांना या विषयात सवलत मिळण्यासाठी अर्ज दिव्यांग प्रमाणपत्रासह संबंधित महाविद्यालयामार्फत विद्यापीठाकडे पूर्व मान्यतेसाठी पाठवावा किंवा संबंधित विद्यापीठाने अशी सवलत मिळण्याबाबतचे नियम तयार करून सर्व महाविद्यालयांचे निदर्शनास आणावेत.

ई) सर्व प्रकारच्या दिव्यांग मुलांसाठी स्पेलींग, व्याकरण, विरामचिन्हे याबाबतीत गुणदान कमी करण्यात येवू नये.

उ) यापैकी काही वर्गवारीसाठी विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी वर्गात आवश्यक असलेली हजेरी/उपस्थिती बंधनकारक राहणार नाही. त्यासाठी संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांची परवानगी बंधनकारक राहील.

**वरीलप्रमाणे सर्वसाधारण सोयी-सवलती सर्व दिव्यांग विद्यार्थ्यांना देय राहतील. याशिवाय त्यांचे दिव्यांगत्वाच्या प्रकारानुसार काही विशेष सोयी-सवलती खालीलप्रमाणे देय राहतील :-**

**२. पूर्णत: अंध (Blindness) व अंशत: अंध (Partial Blind) विद्यार्थ्यांकरीता सवलती :-**

१) परिक्षा कालावधीमध्ये गणितीय पाटीचा (Trailor Frame) वापर करता येईल.

२) परिक्षा कालावधीत आवाजाच्या गणकयंत्राचा (Talking Calculator) वापर करता येईल.

३) अंशत: अंध विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिका लिहिण्यासाठी स्केचपेनचा व प्रश्नपत्रिका वाचण्यासाठी ग्लास मॅग्नीफायरचा वापर करता येईल.

४) अंशत: अंध विद्यार्थ्यांसाठी मोठया अक्षरातील (Arial २० size) प्रश्नपत्रिका छापण्यात यावी.

५) परिक्षेच्या वेळी गरजेनुसार ॲबॅकस व भूमितीय साहित्य साधनाचा वापर करता येईल. आकृत्या, नकाशे, तक्ते इ. न काढण्याची सवलत देय राहील, त्याचे गुण त्या विद्यार्थ्याला त्या प्रमाणात देण्यात येतील अथवा आकृत्या , नकाशे , तक्ते इ. प्रश्नांसाठी पर्यायी प्रश्न देण्यात यावेत.

६) प्रात्यक्षिक परीक्षेऐवजी या विद्यार्थ्यांना या विषयाची तोंडी परीक्षा/बहूपर्यायी उत्तरे असलेली लेखी परिक्षा (प्रात्यक्षिकांवर आधारित) देता येईल. तोंडी परीक्षेत प्रात्यक्षिकांवर आधारित प्रश्न विचारले जावेत.

७) जर एखादया विद्यार्थ्याला संगणकाच्या द्वारे परिक्षा दयावयाची असल्यास स्क्रीन रिडींग सॉफ्टवेअर असलेला संगणक- NVDA Software/तत्सम इतर संगणक प्रणालीचा वापर करता येईल. परंतु त्यासाठी विद्यापीठाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील.

८) विदयार्थ्यांना टेपरेकॉर्डरद्वारे प्रश्न देण्यात यावेत आणि त्यांनी प्रश्नांना दिलेली उत्तरे टेपरेकॉर्डवर रेकॉर्ड करण्यात यावीत व त्यांच्या बसण्याची स्वतंत्र व्यवस्था असावी.

९) ज्यावेळी दृष्टीहीन मुलगा बऱ्याच वेळेपासून ब्रेलमध्ये लिहित असेल आणि ज्यामुळे त्याला थकवा जाणवत असेल अशावेळी त्यास काही काळ विश्रांती देण्यात यावी, तथापि ही वेळ सवलतीच्या एकूण वेळेपेक्षा जास्त नसावी.

१०) ज्यावेळी ब्रेलवाचन, लेखन चाचणी असेल अशावेळी ब्रेललिपीतील चुकांबाबत गुण कमी करु नयेत. तसेच गरज असेल अशावेळी मौखिक पध्दतीने प्रश्नांची उत्तरे विचारुन त्याला कितपत ज्ञान आहे याबद्दल चाचणी घेण्यात यावी. चित्र/आकृत्या/नकाशे याऐवजी पर्यायी प्रश्न देण्यात यावेत. वस्तुनिष्ठ प्रश्नांसाठी सुस्पष्ट सूचना देण्यात याव्यात.

११) ज्यावेळेस निबंधात्मक प्रश्न असतात आणि ते प्रश्न ब्रेलमध्ये लिहितात अशावेळी सदर प्रश्नावर गुणदान करतांना उत्तरे मोठ्या प्रमाणात लिहिलेले आहे हे न पाहता मुख्य मुद्यांवर (Key Points) वर लक्ष देण्यात यावे. महाविद्यालयाने याविषयीचा पत्रव्यवहार विद्यापीठाशी करणे अत्यावश्यक आहे.

१२) प्रकल्पावर आधारित लेखी परिक्षेऐवजी तोंडी परिक्षा घेण्यात यावी.

**(३) कुष्ठरोग निवारित (Leprosy Cured Persons) विद्यार्थ्यांसाठी सवलती :-**

१. ज्या महाविद्यालयात हे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत ते किंवा जवळचे महाविद्यालय या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी परीक्षा केंद्र म्हणून देण्यात यावे.

२. शिकत असलेल्या महाविद्यालयातच शरीराची योग्य स्थिती आणि बसण्याच्या व्यवस्थेसाठी अनुकुल तयार केलेले टेबल, टायपिंग मशीन, खुर्च्या यांची या विद्यार्थ्यांसाठी व्यवस्था करण्यात यावी. यासाठी संबंधित महाविद्यालयाने विद्यापीठाची मान्यता/पूर्वपरवानगी घ्यावी.

३. अचानक उपचार करावे लागतील अशी स्थिती उत्पन्न झाली ; परीक्षेच्या कालावधीतच उपचारासाठी हॉस्पिटल मध्ये दाखल व्हावे लागले तर अशा प्रसंगी विद्यार्थ्यांच्या भविष्याचा विचार करुन त्यास पुन:परीक्षेची (Re-Exam) परवानगी देण्यात यावी. विषय शिक्षक, महाविद्यालयाचे प्राचार्य व परीक्षा विभागाचे प्रमुख यांनी यासाठी समन्वय साधावा.

४. विद्यार्थ्यांना लिहायला सोयीचे व्हावे यासाठी वेगळया प्रकारची पेन्सिल, पेन, ग्रीपर, संगणक देण्याची व्यवस्था उपलब्ध व्हावी.

५. गरजेनुसार लेखनिक घेण्याची परवानगी देण्यात यावी.

**(४) कर्णबधिर विद्यार्थ्यांसाठी** (Hearing Impairment-deft and hard of hearing) **सवलती :-**

१) प्रश्नाचे उत्तर अपेक्षित शब्दमर्यादेपेक्षा कमी शब्द मर्यादेत लिहिता येईल. दीर्घोत्तरी प्रश्नांची उत्तरे मुद्यांमध्ये लिहिता येतील. दिर्घोत्तरी प्रश्नांमध्ये मुख्य मुद्यांच्या अनुषंगाने (Key points) उत्तर लिहील्यास परिक्षकांनी उत्तरामध्ये थोडक्यात विषयाच्या अनुषंगाने माहिती/उत्तरे दिली आहेत का ते तपासून गुणदान करावे.

२) या मुलांसाठी स्पेलींग, व्याकरण, विरामचिन्हे या बाबतीत गुणदान कमी करण्यात येऊ नयेत.

३) सर्व विषयाच्या प्रश्नपत्रिकेमध्ये प्रश्नांची शब्दरचना सरळ व सोपी असावी.मौखिक मुल्यमापनासाठी लेखीचा पर्याय असावा.

४) आवश्यकता असल्यास अशा विद्यार्थ्यांना वाचनिक/ सूचक (Prompter) देण्यात यावा.

५) गरजेनुसार विद्यार्थ्याला त्यास हव्या त्या भाषेत पेपरी लिहिण्याची परवानगी देण्यात यावी.

**(५) लोकोमोटर डिसेबिलिटी अस्थिव्यंगासह** (Locomotor Disability Including Orthopedic Disability)**, बहुविकलांगता** (Multiple Disabilities) **व सेरेब्रल पाल्सी** (Cerebral Palsy) **विद्यार्थ्यांसाठी सवलती :-**

१) ज्या महाविद्यालयात हे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत तेच महाविद्यालय या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी परीक्षा केंद्र म्हणून देण्यात यावे. शिकत असलेल्या महाविद्यालयातच शरीराची योग्य स्थिती आणि बसण्यासाठी अनुकुल असे तयार केलेले टेबल, टायपिंग मशीन, खुर्च्या यांची या विद्यार्थ्यांसाठी व्यवस्था करावी लागेल. तथापि, यासाठी संबंधित महाविद्यालयाने विद्यापीठाची मान्यता/पूर्व परवानगी घ्यावी.

२) ज्या विद्यार्थ्यांना आवश्यकता असेल त्यांना उत्तरपत्रिका टाईप करणे किंवा लिहिण्यासाठी तसेच पूर्ण प्रश्नपत्रिका किंवा प्रश्नपत्रिकेचा काही भाग लिहिण्यासाठी लेखनिक घेण्यास परवानगी देण्यात येईल. जर हे विद्यार्थी स्वत: प्रश्नपत्रिका सोडवत असताना मधेच थकले ; पुढे प्रश्नपत्रिका सोडवू शकत नाही असे वाटल्यास त्यांना महाविद्यालयातील प्रत्यक्ष अध्यापनाशी संबंध नसलेला कोणताही कर्मचारी लेखनिक म्हणून देता येईल. हा कर्मचारी या विद्यार्थ्यांने बोललेली भाषा समजू शकत असावा. या लेखनिकांची काळजीपूर्वक निवड करावी हा लेखनिक बहुविकलांग, सेरेब्रल पाल्सी, लोकोमोटर डिसेबिलिटी विद्यार्थी काय सांगतो ते समजून लिहू शकेल असा असावा.

३) आकृत्या, नकाशे, तक्ते इ. न काढण्यासाठी सवलत देय राहील. याचे गुण त्या विद्यार्थ्याला त्याचे प्रमाणात देण्यात यावेत.

४) प्रात्यक्षिक परीक्षेऐवजी या विद्यार्थ्यांना या विषयाची तोंडी परीक्षा/बहूपर्यायी उत्तरे असलेली लेखी परिक्षा (प्रात्यक्षिकांवर आधारित) देता येईल. तोंडी परीक्षेत प्रात्यक्षिकांवर आधारित प्रश्न विचारले जावेत.

५) या मुलांना अतिरिक्त सूचना किंवा संकेताची गरज भासते, तेव्हा परिक्षेच्या वेळी त्यांची बैठकीची वेगळी व्यवस्था करण्यात यावी.

६) अशा विद्यार्थ्यांच्या परिक्षासाठी तांत्रिक पध्दतीचा वापर करण्यात यावा.(उदा.संगणक व संगणक प्रणाली Voice Synthesizer)

७) प्रश्नाची प्रक्रिया जाणून घेण्यासाठी संप्रेषण बोर्ड (Communication Board) चा वापर करावा.

८) अनुकुलनशील साहित्य आणि उपकरणांचा वापर करु देण्यात यावा. उदा.पेन्सिल व ग्रीप्स.

९) हे विद्यार्थी जास्त दाब देऊन लिहितात त्यासाठी आवश्यकतेनुसार कागद/उत्तरपत्रिका जाड पानांची देण्यात यावी.

**(६) शारिरीक वाढ खुंटणे (Dwarfism) :-**

१) ज्या महाविद्यालयात हे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत तेच महाविद्यालय या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी परीक्षा केंद्र म्हणून देण्यात येईल. शिकत असलेल्या महाविद्यालयातच शरीराची योग्य स्थिती आणि बसण्याच्या व्यवस्थेसाठी अनुकुल तयार केलेले टेबल, टायपिंग मशीन, खुर्च्या यांची या विद्यार्थ्यांसाठी व्यवस्था करावी. तथापि, यासाठी संबंधित महाविद्यालयाने विद्यापीठाची मान्यता/पूर्व परवानगी घ्यावी.

२) लेखनिक घेण्याची परवानगी देण्यात यावी.

३) आवश्यकता असेल तर वाचनिक/सूचक घेण्याची परवानगी असावी.

**(७) बौध्दिक अक्षम (मतिमंद/गतिमंद) (Intellectual Disability-Mentally challenged/ Slow Learners) :-**

१) विद्यार्थ्यांना आकृत्या, नकाशे, तक्ते इ. न काढण्याची सवलत देण्यात यावी. त्यासाठीचे गुण त्या विद्यार्थ्याला त्याच प्रमाणात देण्यात यावेत.

२) विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिका टाईप करुन वा लिहून देण्याची परवानगी प्रदान करण्यात यावी. त्यांना पूर्ण प्रश्नपत्रिका वा प्रश्नपत्रिकेचा काही भाग लिहिण्यासाठी लेखनिक घेण्यास परवानगी देण्यात येईल. हे विद्यार्थी स्वत: प्रश्नपत्रिका सोडवत असताना मध्येच थकले, पुढे प्रश्नपत्रिका सोडवू शकत नाही असे वाटल्यास त्यांना महाविद्यालयातील प्रत्यक्ष अध्यापनाशी संबंध नसलेला कोणताही कर्मचारी लेखनिक म्हणून घेता येईल. हा कर्मचारी या विद्यार्थ्यांने बोललेली भाषा समजू शकत असावा. या लेखनिकांची काळजीपूर्वक निवड करावी. हा लेखनिक अध्ययन अक्षम विद्यार्थी काय सांगतो ते समजून लिहू शकेल असा असावा.

३) प्रात्यक्षिक परीक्षेऐवजी त्या विद्यार्थ्यांना त्या विषयाची तोंडी परीक्षा/बहूपर्यायी उत्तरे असलेली लेखी परिक्षा (प्रात्यक्षिकांवर आधारित) देता येईल. तोंडी परीक्षेत प्रात्यक्षिकांवर आधारित प्रश्न विचारले जावेत.

४) या गटात मोडणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांची कारक कौशल्ये अविकसित असतात याचा विचार करुन त्यांना वेगळया प्रकारची पेन्सील, पेन, ग्रीपर, गणकयंत्र वापरण्याची परवानगी द्यावी.

५) आवश्यकतेनुसार प्रौढ लेखनिक देण्यात यावा.

**(८) मानसिक आजार (Mental Illness):-**

१) ज्या महाविद्यालयात हे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत ते महाविद्यालय अथवा घराजवळचे महाविद्यालय या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी परीक्षा केंद्र म्हणून देण्यात यावे.

२) या विद्यार्थ्यांची परीक्षा वेगळया वर्गात घेण्यात यावी.

३) विद्यार्थी अचानक आक्रमक/हिंसक बनला तर परिस्थिती हाताळू शकेल असाच पर्यवेक्षक नेमावा.

४) लेखी परीक्षेऐवजी ऑडिओ/व्हीडीओ रेकॉर्डर वापरुन मौखिक परीक्षा घेण्याची परवानगी देण्यात यावी.

**(९) स्वमग्न (Autism Spectrum Disorder) विद्यार्थ्यांसाठी सवलती :-**

१) ज्या महाविद्यालयात हे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत ते महाविद्यालय या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी परीक्षा केंद्र म्हणून देण्यात यावे. त्यांच्या महाविद्यालयातच या मुलांसाठी विशेष तयार केलेले टेबल, टायपिंगमशीन, संगणक, गणकयंत्र, खुर्च्या यांची व्यवस्था करण्यात यावी.

२) विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिका टाईप करुन वा लिहून देण्याची परवानगी देण्यात येईल. त्यांना पूर्ण उत्तरपत्रिका किंवा उत्तरपत्रिकेचा काही भाग लिहिण्यासाठी लेखनिक घेण्यास परवानगी देण्यात यावी. जर हे विद्यार्थी स्वत: प्रश्नपत्रिका सोडवत असताना मधेच थकले, पुढे प्रश्नपत्रिका सोडवू शकत नाहीत असे वाटल्यास,त्यांना महाविद्यालयातील प्रत्यक्ष अध्यापनाशी संबंध नसलेला कोणताही कर्मचारी लेखनिक म्हणून घेता येईल. हा कर्मचारी या विद्यार्थ्याने बोललेली भाषा समजू शकत असावा. या लेखनिकांची काळजीपूर्वक निवड करावी. हा लेखनिक ऑटिस्टिक विद्यार्थी काय सांगतो ते लिहू शकेल असा असावा.

३) विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी त्याला खात्री वाटेल अशी व्यक्ती परीक्षा वर्गाजवळ उपस्थित रहाण्याची परवानगी देण्यात यावी.

४) विद्यार्थ्यांना आकृत्या, नकाशे/तक्ते इ. न काढण्याची सवलत देण्यात येईल. त्याचे गुण त्या विद्यार्थ्याला त्या प्रमाणात देण्यात येतील.

५) प्रात्यक्षिक आणि प्रकल्प परीक्षेस विद्यार्थ्यांना या विषयाची तोंडी परीक्षा/बहूपर्यायी उत्तरे असलेली लेखी परिक्षा (प्रात्यक्षिकांवर आधारित) देता येईल. तोंडी परीक्षेत प्रात्यक्षिकांवर आधारित प्रश्न विचारले जावेत.

६) मौखिक मुल्यमापनासाठी लेखीचा पर्याय असावा.

७) आवश्यकतेनुसार प्रौढ लेखनिक देण्यात यावा.

८) आवश्यकतेनुसार वाचनिक/Prompter (सूचक) देण्यात यावा.

९) प्रश्नाचे उत्तर अपेक्षित शब्दमर्यादेपेक्षा कमी शब्द मर्यादेत लिहिता येईल. दिर्घोत्तरी प्रश्नाची उत्तरे मुद्यांमध्ये (Key Points) लिहिता येतील. दिर्घोत्तरी प्रश्नांमध्ये मुख्य मुद्यांच्या अनुषंगाने उत्तर दिल्यास परिक्षकांनी परिक्षेतील उत्तरामध्ये थोडक्यात विषयाच्य अनुषंगाने माहिती/उत्तरे दिली आहेत का ते तपासून गुणदान करावे.

१०) या विद्यार्थ्यांची परीक्षा वेगळया वर्गात घेण्यात यावी.

११) अचानक उपचार करावे लागतील अशी स्थिती उत्पन्न झाल्यास किंवा परीक्षेच्या कालावधीतच उपचारासाठी हॉस्पीटलमध्ये दाखल व्हावे लागल्यास अशा विद्यार्थ्यांच्या भविष्याचा विचार करुन त्यांना पुन:परीक्षेची (Re-Exam) परवानगी देण्यात यावी. विषय शिक्षक, महाविद्यालयाचे प्राचार्य व परीक्षा विभागाचे प्रमुख यांनी यासाठी समन्वय साधावा.

१२) या गटात मोडणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांची कारक कौशल्य अविकसित असतात. याचा विचार करुन त्यांना वेगळया प्रकारची पेन्सील, पेन, ग्रीपर, गणकयंत्र वापरण्याची परवानगी देण्यात यावी.

११) अनिवार्य विषयाऐवजी (सायन्स, गणित इ.) विद्यार्थ्याला त्याला झेपेल असा विषय निवडून परीक्षा देण्याची परवानगी देण्यात यावी.

**(१०) स्नायुंची विकृती (Muscular Dystrophy)/ मेंदू व मज्जापेशी काठीण्य (Multiple Sclerosis) विद्यार्थ्यांसाठी सवलती :-**

१) ज्या महाविद्यालयात हे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत ते किंवा जवळचे महाविद्यालय या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी परीक्षा केंद्र म्हणून देण्यात यावे.

२) अचानक उपचार करावे लागतील अशी स्थिती उत्पन्न झाल्यास किंवा परीक्षेच्या कालावधीतच उपचारासाठी हॉस्पीटलमध्ये दाखल व्हावे लागल्यास अशा विद्यार्थ्यांच्या भविष्याचा विचार करुन त्यांना पुन:परीक्षेची (Re-Exam) परवानगी देण्यात यावी. विषय शिक्षक, महाविद्यालयाचे प्राचार्य व परीक्षा विभागाचे प्रमुख यांनी यासाठी समन्वय साधावा.

३) या विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था वेगळया वर्गात करावी. वेळ प्रसंगी स्पेशल पर्यवेक्षकाची नेमणूक करावी. परीक्षा विभाग प्रमुख , महाविद्यालयीन अधिकारी यांच्या परवानगीने आवश्यकता असेल तर परीक्षा हॉस्पिटल अथवा विद्यार्थ्यांच्या घरी घेण्यात यावी.

४) लेखी परीक्षेऐवजी ऑडिओ/व्हीडीओ रेकॉर्डर वापरुन मौखिक परीक्षा घेण्याची परवानगी देण्यात यावी.

**(११) मज्जासंस्थेचे तीव्र आजार** (Chronic Neurological Conditions) :-

१) ज्या महाविद्यालयात हे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत ते किंवा जवळचे महाविद्यालय या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी परीक्षा केंद्र म्हणून देण्यात यावे.

२) अचानक उपचार करावे लागतील अशी स्थिती उत्पन्न झाल्यास किंवा परीक्षेच्या कालावधीतच उपचारासाठी हॉस्पीटलमध्ये दाखल व्हावे लागल्यास अशा तर विद्यार्थ्यांच्या भविष्याचा विचार करुन त्याना पुन:परीक्षेची (Re-Exam) परवानगी देण्यात यावी. विषय शिक्षक, महाविद्यालयाचे प्राचार्य व परीक्षा विभागाचे प्रमुख यांनी यासाठी समन्वय साधावा.

३) या विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था वेगळया वर्गात करावी. वेळ प्रसंगी स्पेशल पर्यवेक्षकाची नेमणूक करावी. परीक्षा विभाग प्रमुख , महाविद्यालयीन अधिकारी यांच्या परवानगीने आवश्यकता असेल तर परीक्षा हॉस्पिटल अथवा विद्यार्थ्यांच्या घरी घेण्यात यावी.

४) लेखी परीक्षेऐवजी ऑडिओ/व्हीडीओ रेकॉर्डर वापरुन मौखिक परीक्षा घेण्याची परवानगी देण्यात यावी.

**(१२) अध्ययन अक्षम** (Specific Learning Disabilities) **विद्यार्थ्यांसाठी सवलती :-**

१) विद्यार्थ्यांना आकृत्या, नकाशे, तक्ते इ. न काढण्यासाठी सवलत देण्यात यावी. सदरचे गुण त्या विद्यार्थ्याला, त्या प्रमाणात देण्यात यावेत.

२) विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिका टाईप करुन वा लिहून देण्याची परवानगी देण्यात येईल. त्यांना पूर्ण उत्तरपत्रिका किंवा उत्तरपत्रिकेचा काही भाग लिहिण्यासाठी लेखनिक घेण्यास परवानगी देण्यात येईल. जर हे विद्यार्थी स्वत: प्रश्नपत्रिका सोडवत असताना मधेच थकले, पुढे प्रश्नपत्रिका सोडवू शकत नाही असे वाटल्यास त्यांना महाविद्यालयातील प्रत्यक्ष अध्यापनाशी संबंध नसलेला कोणताही कर्मचारी लेखनिक म्हणून घेता येईल. हा कर्मचारी या विद्यार्थ्याने बोललेली भाषा समजू शकत असावा. या लेखनिकांची काळजीपूर्वक निवड करावी. हा लेखनिक अध्ययन अक्षम विद्यार्थी काय सांगतो ते समजून लिहू शकेल असा असावा.

३) प्रात्यक्षिक आणि प्रकल्प परीक्षेस विद्यार्थ्यांना या विषयाची तोंडी परीक्षा/बहूपर्यायी उत्तरे असलेली लेखी परिक्षा (प्रात्यक्षिकांवर आधारित) देता येईल. तोंडी परीक्षेत प्रात्यक्षिकांवर आधारित प्रश्न विचारले जावेत.

४) या गटात मोडणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांची कारक कौशल्ये अविकसित असतात. याचा विचार करुन त्यांना वेगळया प्रकारची पेन्सील, पेन, ग्रीपर, गणकयंत्र वापरण्याची परवानगी देण्यात यावी.

५) लेखी परीक्षेऐवजी ऑडिओ/व्हीडीओ रेकॉर्डर वापरुन मौखिक परीक्षा घेण्याची परवानगी देण्यात यावी.

६) आवश्यकतेनुसार प्रौढ लेखनिक देण्यात यावा.

७) प्रश्नाचे उत्तर अपेक्षित शब्दमर्यादेपेक्षा कमी शब्द मर्यादेत लिहिता येईल. दिर्घोत्तरी प्रश्नाची उत्तरे मुद्यांमध्ये (Key Points) लिहिता येतील. अशा दिर्घोत्तरी प्रश्नांमध्ये मुख्य मुद्यांच्या

अनुषंगाने उत्तर लिहील्यास परिक्षकांनी उत्तरामध्ये थोडक्यात विषयाच्या अनुषंगाने माहिती/उत्तरे दिली आहेत का ते तपासून गुणदान करावे.

**(१३) मेंदू व मज्जापेशी काठीण्य (Multiple Sclerosis) विद्यार्थ्यांसाठी सवलती :-**

१) ज्या महाविद्यालयात हे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत ते किंवा जवळचे महाविद्यालय या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी परीक्षा केंद्र म्हणून देण्यात यावे.

२) अचानक उपचार करावे लागतील अशी स्थिती उत्पन्न झाल्यास किंवा परीक्षेच्या कालावधीतच उपचारासाठी हॉस्पीटलमध्ये दाखल व्हावे लागल्यास त्या विद्यार्थ्यांच्या भविष्याचा विचार करुन त्याना पुन:परीक्षेची (Re-Exam) परवानगी देण्यात यावी. विषय शिक्षक, महाविद्यालयाचे प्राचार्य व परीक्षा विभागाचे प्रमुख यांनी यासाठी समन्वय साधावा.

३) या विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था वेगळया वर्गात करावी. वेळ प्रसंगी स्पेशल पर्यवेक्षकाची नेमणूक करावी. परीक्षा विभाग प्रमुख , महाविद्यालयीन अधिकारी यांच्या परवानगीने आवश्यकता असेल तर परीक्षा हॉस्पिटल अथवा विद्यार्थ्यांच्या घरी घेण्यात यावी.

४) लेखी परीक्षेऐवजी ऑडिओ/व्हीडीओ रेकॉर्डर वापरुन मौखिक परीक्षा घेण्याची परवानगी देण्यात यावी.

**(१४) भाषण (वाचा) व भाषा अक्षमत्व (Speech and Language Disability) असलेल्या विद्यार्थ्यांसाठी सवलती :-**

१) ज्यावेळेस निबंधात्मक प्रश्न असतात अशावेळी सदर प्रश्नावर गुणदान करतांना उत्तरे मोठ्या प्रमाणात लिहिलेले आहे हे न पाहता मुख्य मुद्यांवर (Key Points) वर लक्ष देण्यात यावे. महाविद्यालयाने याविषयीचा पत्रव्यवहार विद्यापीठाशी करणे अत्यावश्यक आहे.

२) विद्यार्थ्यांना आकृत्या, नकाशे/तक्ते इ. न काढण्याची सवलत देण्यात यावी. त्याचे गुण त्या विद्यार्थ्याला त्या प्रमाणात देण्यात यावेत अथवा त्यासाठी पर्यायी प्रश्न विचारण्यात यावेत.

३) अनिवार्य विषयाऐवजी (सायन्स, गणित इ.) विद्यार्थ्याला त्यास झेपेल असा विषय निवडून परीक्षा देण्याची परवानगी देण्यात यावी.

४) तोंडी परीक्षा लेखी स्वरुपात स्वरुपाची परवानगी देण्यात यावी.

**(१५) थॅलस्सेमिया (Thalassemia)/ कॅन्सर (Cancer):-**

१) महाविद्यालयात हे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत ते किंवा जवळचे महाविद्यालय या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी परीक्षा केंद्र म्हणून देण्यात येईल. त्यांच्या महाविद्यालयातच या मुलांसाठी विशेष तयार केलेले टेबल, टायपिंग मशीन, खुर्च्यांची व्यवस्था करण्यात यावी. तथापि, यासाठी संबंधित महाविद्यालयाने विद्यापीठाची मान्यता/पूर्व परवानगी घ्यावी.

२) अचानक उपचार करावे लागतील अशी स्थिती उत्पन्न झाल्यास किंवा परीक्षेच्या कालावधीतच उपचारासाठी हॉस्पीटलमध्ये दाखल व्हावे लागले तर विद्यार्थ्यांच्या भविष्याचा विचार करुन त्यांना पुन:परीक्षेची (Re-Exam) परवानगी देण्यात यावी. विषय शिक्षक, महाविद्यालयाचे प्राचार्य व परीक्षा विभागाचे प्रमुख यांनी यासाठी समन्वय साधावा.

३) इन्फेक्शनची शक्यता लक्षात घेऊन या विद्यार्थ्यांसाठी बैठक व्यवस्था वेगळया वर्गात करावी. वेळ प्रसंगी स्पेशल पर्यवेक्षकाची नेमणूक करावी व परीक्षा विद्यार्थ्यांच्या घरी घेण्यात यावी.

४) विद्यार्थ्यांना लिहावयाचे सोयीचे व्हावे यासाठी वेगळया प्रकारची पेन्सील , पेन, ग्रीपर, संगणक देण्याची व्यवस्था उपलब्ध करावी.

५) गरज असल्यास त्यांना लेखनिक घेण्याची परवानगी देण्यात यावी.
६) विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी त्याला खात्री वाटेल अशी व्यक्ती परीक्षा वर्गाजवळ उपस्थित रहाण्याची परवानगी देण्यात यावी.
७) यापेक्षा वेगळया सोयी हव्या असतील तर पालक विषय शिक्षक, प्राचार्य व परीक्षा विभाग प्रमुख यांच्या समन्वयाने ठरविण्यात यावे.

**(१६) हिमोफिलिया** (Hemophilia):-

१) ज्या महाविद्यालयात हे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत ते किंवा जवळचे महाविद्यालय या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी परीक्षा केंद्र म्हणून देण्यात येईल. त्यांच्या महाविद्यालयातच या मुलांसाठी विशेष तयार केलेले टेबल, टायपिंग मशीन, खुर्च्याची व्यवस्था करण्यात यावी. तथापि, यासाठी संबंधित महाविद्यालयाने विद्यापीठाची मान्यता/पूर्व परवानगी घ्यावी.
२) अचानक उपचार करावे लागतील अशी स्थिती उत्पन्न झाल्यास किंवा परीक्षेच्या कालावधीतच उपचारासाठी हॉस्पीटलमध्ये दाखल व्हावे लागल्यास विद्यार्थ्यांच्या भविष्याचा विचार करुन त्यांना पुन:परीक्षेची (Re-Exam) परवानगी देण्यात यावी. विषय शिक्षक, महाविद्यालयाचे प्राचार्य व परीक्षा विभागाचे प्रमुख यांनी यासाठी समन्वय साधावा.
३) इन्फेक्शनची शक्यता लक्षात घेऊन या विद्यार्थ्यांसाठी बैठक व्यवस्था वेगळया वर्गात करावी. वेळ प्रसंगी स्पेशल पर्यवेक्षकाची नेमणूक करावी व परीक्षा विद्यार्थ्याच्या घरी घेण्यात यावी.
४) विद्यार्थ्यांना लिहावयाचे सोयीचे व्हावे यासाठी वेगळया प्रकारची पेन्सील , पेन, ग्रीपर, संगणक देण्याची व्यवस्था उपलब्ध करावी.
५) गरज असल्यास त्यांना लेखनिक घेण्याची परवानगी देण्यात यावी.
६) विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी त्याला खात्री वाटेल अशी व्यक्ती परीक्षा वर्गाजवळ उपस्थित रहाण्याची परवानगी देण्यात यावी.
७) यापेक्षा वेगळया सोयी हव्या असतील तर पालक विषय शिक्षक, प्राचार्य व परीक्षा विभाग प्रमुख यांच्या समन्वयाने ठरविण्यात यावे.

**(१७) सिकल सेल** (Sickle Cell Disease):-

१) ज्या महाविद्यालयात हे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत ते किंवा जवळचे महाविद्यालय या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी परीक्षा केंद्र म्हणून देण्यात येईल. त्यांच्या महाविद्यालयातच या मुलांसाठी विशेष तयार केलेले टेबल, टायपिंग मशीन, खुर्च्याची व्यवस्था करण्यात यावी. तथापि, यासाठी संबंधित महाविद्यालयाने विद्यापीठाची मान्यता/पूर्व परवानगी घ्यावी.
२) अचानक उपचार करावे लागतील अशी स्थिती उत्पन्न झाल्यास किंवा परीक्षेच्या कालावधीतच उपचारासाठी हॉस्पीटलमध्ये दाखल व्हावे लागल्यास विद्यार्थ्यांच्या भविष्याचा विचार करुन त्यांना पुन:परीक्षेची (Re-Exam) परवानगी देण्यात यावी. विषय शिक्षक, महाविद्यालयाचे प्राचार्य व परीक्षा विभागाचे प्रमुख यांनी यासाठी समन्वय साधावा.
३) इन्फेक्शनची शक्यता लक्षात घेऊन या विद्यार्थ्यांसाठी बैठक व्यवस्था वेगळया वर्गात करावी. वेळ प्रसंगी स्पेशल पर्यवेक्षकाची नेमणूक करावी व परीक्षा विद्यार्थ्याच्या घरी घेण्यात यावी.
४) विद्यार्थ्यांना लिहावयाचे सोयीचे व्हावे यासाठी वेगळया प्रकारची पेन्सील , पेन, ग्रीपर, संगणक देण्याची व्यवस्था उपलब्ध करावी.
५) गरज असल्यास त्यांना लेखनिक घेण्याची परवानगी देण्यात यावी.

६) विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी त्याला खात्री वाटेल अशी व्यक्ती परीक्षा वर्गाजवळ उपस्थित रहाण्याची परवानगी देण्यात यावी.

७) यापेक्षा वेगळया सोयी हव्या असतील तर पालक विषय शिक्षक, प्राचार्य व परीक्षा विभाग प्रमुख यांच्या समन्वयाने ठरविण्यात यावे.

**(१८) ॲसिड अॅटॅक व्हिक्टीम (Acid Attack Victim) विद्यार्थ्यांसाठी सवलती :-**

१) ज्या महाविद्यालयात हे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत ते किंवा जवळचे महाविद्यालय या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी परीक्षा केंद्र म्हणून देण्यात यावे.

२) शिकत असलेल्या महाविद्यालयातच शरीराची योग्य स्थिती आणि बसण्यासाठी अनुकुल असे तयार केलेले टेबल, टायपिंग मशीन, खुर्च्या यांची या विद्यार्थ्यांसाठी व्यवस्था करण्यात यावी. तथापि, यासाठी संबंधित महाविद्यालयाने विद्यापीठाची मान्यता/पूर्व परवानगी घ्यावी.

३) अचानक उपचार करावे लागतील अशी स्थिती उत्पन्न झाल्यास किंवा परीक्षेच्या कालावधीतच उपचारासाठी हॉस्पीटलमध्ये दाखल व्हावे लागल्यास विद्यार्थ्यांच्या भविष्याचा विचार करुन त्यांना पुन:परीक्षेची (Re-Exam) परवानगी देण्यात यावी. विषय शिक्षक, महाविद्यालयाचे प्राचार्य व परीक्षा विभागाचे प्रमुख यांनी यासाठी समन्वय साधावा.

४) विद्यार्थ्यांना लिहावयाचे सोयीचे व्हावे यासाठी वेगळया प्रकारची पेन्सील , पेन, ग्रीपर, संगणक देण्याची व्यवस्था उपलब्ध करुन द्यावी.

५) गरज असल्यास त्यांना लेखनिक घेण्याची परवानगी द्यावी.

**(१९) पार्किंसन्स (Parkinson॰s Disease):-**

१) ज्यावेळेस निबंधात्मक प्रश्न असतात अशावेळी सदर प्रश्नावर गुणदान करतांना उत्तरे मोठ्या प्रमाणात लिहिलेले आहे हे न पाहता मुख्य मुद्यांवर(Key Points) वर लक्ष देण्यात यावे. महाविद्यालयाने याविषयीचा पत्रव्यवहार विद्यापीठाशी करणे अत्यावश्यक आहे.

२) विद्यार्थ्यांना आकृत्या, नकाशे/तक्ते इ. न काढण्याची सवलत देण्यात यावी. त्याचे गुण त्या विद्यार्थ्याला त्या प्रमाणात देण्यात यावेत अथवा त्यासाठी पर्यायी प्रश्न विचारण्यात यावेत.

३) तोंडी परीक्षा लेखी स्वरुपाची परवानगी देण्यात यावी.

उपरोक्त नमुद वर्गवारीतील दिव्यांग विद्यार्थी ज्या महाविद्यालयामध्ये शिक्षण घेत आहे त्या महाविद्यालयातील प्राचार्यांनी या शासन निर्णयामध्ये नमुद केलेल्या सर्व सवलती व सुविधा या विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना मिळतील याची दक्षता घ्यावी. सदर शासन निर्णय राज्यातील उच्च व तंत्र शिक्षण विभागातंर्गत येणाऱ्या सर्व विद्यापीठे व त्यांच्या संलग्नीत असणारी सर्व महाविद्यालये तसेच राज्यशासना मार्फत विशेष कायद्यान्वये स्थापन करण्यात आलेल्या सर्व स्वंय अर्थसहाय्यीत विद्यापीठांना लागू राहील. सदर आदेशाची प्रभावी अमंलबजावणी होईल हे पाहण्याची जबाबदारी सर्व उपरोक्त नमुद विद्यापीठांची राहील.

सदरहू शासन निर्णयाची तात्काळ प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७०३०४१३१६२५२३०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Siddharth Kharat

Digitally signed by Siddharth Kharat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6f8cb55012423727bece629d954713c1ec2962a9ca9b909643170e56321cfd24, cn=Siddharth Kharat
Date: 2017.03.04 17:49:42 +05'30'

**( सिध्दार्थ खरात )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय ,मुंबई.
४. मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय ,मुंबई.
५. मा. अप्पर मुख्य सचिव,उच्च व तंत्रशिक्षण यांचे स्वीय सहाय्यक ,मंत्रालय ,मुंबई.
६. सर्व अकृषी विद्यापीठांचे कुलगुरु /कुलसचिव.
७. राज्यातील सर्व स्वंय अर्थसहाय्यीत विद्यापीठांचे कुलगुरु / कुलसचिव.
८. सर्व संचालक, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
९. उप सचिव, (विशि) (मशि) (तांशि) उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१०. निवड नस्ती- विशि-३.

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

प्रो. रजनीश जैन
सचिव

**Prof. Rajnish Jain**
**Secretary**

सत्यमेव जयते

विश्वविद्यालय अनुदान आयोग
**University Grants Commission**
(मानव संसाधन विकास मंत्रालय, भारत सरकार)
**(Ministry of Human Resource Development, Govt. of India)**
बहादुर शाह ज़फ़र मार्ग, नई दिल्ली-110002
Bahadur Shah Zafar Marg, New Delhi-110002
Ph :. 011-23236288/23239337
Fax : 011-2323 8858
E-mail : secy.ugc@nic.in

F.No.6-2/2013(SCT)

January, 2019

14 JAN 2019

The Registrar,
All Universities/Deemed to be Universities

Sub: - Guidelines for conducting written examination for Persons with Benchmark Disabilities.

Sir/Madam,

The undersigned is directed to forward herewith a copy of the O.M. No.3402/2015-DD-III dated 29.8.2018 of Ministry of Social Justice & Empowerment, Department of Empowerment of Persons with Disabilities, New Delhi received through Ministry of HRD, New Delhi regarding "Guidelines for conducting written examination for Persons with Benchmark Disabilities". The Central Government (D/oEPwD) has laid down the Guidelines for conducting written examination for persons with Benchmark Disabilities, 2018 in supersession of the earlier Guidelines issued vide OM No.F.16-110/2003-DD.III dated 26.02.2013.

You are requested to take immediate action as per the above guidelines. These guidelines may also be circulated to the constituent and affiliated colleges for strict compliance.

Yours sincerely,

(.Rajnish Jain)

**Encl: As above.**

F. No. 34-02/2015-DD-III

**Government of India**

**Ministry of Social Justice & Empowerment**

**Department of Empowerment of of Persons with Disabilities (Divyangjan)**

***

Pt. Deendayal Antyodaya Bhawan,
C.G.O. Complex, New Delhi -110003
Dated: the 29th August, 2018

**Office Memorandum**

**Subject:** Guidelines for conducting written examination for Persons with Benchmark Disabilities

The undersigned is directed to say that this Department had issued the guidelines for conducting written examination for persons with disabilities defined in terms of erstwhile Persons with Disabilities (Equal Opportunities, Protection for Rights and Full Participation) Act, 1995 vide OM No. 16-110/2003-DD.III dated 26/02/2013. The Department had constituted a Committee under the Chairmanship of Secretary, DEPwD in March, 2015 to review the said guidelines based on the issues raised by Union Public Service Commission and others. Meanwhile the Central Government enacted the Rights of Persons with Disabilities Act, 2016 (RPwD Act, 2016 ) which came into force from 19.04.2017. The Act provides for reservation in Government jobs for persons with benchmark disabilities as defined under section 2 (r) of the said Act.

Based on the findings of the Committee, the Central Government hereby lays down the revised guidelines for conducting written examination for persons with benchmark disabilities in supersession of the earlier guidelines issued vide OM No. 16-110/2003-DD.III dated 26/02/2013 as under:

I. These guidelines may be called as "Guidelines for conducting written examination for persons with benchmark disabilities 2018".

II. There should be a uniform and comprehensive policy across the country for persons with benchmark disabilities for written examination taking into account improvement in technology and new avenues opened to the persons with benchmark disabilities providing a level playing field. Policy should also have flexibility to accommodate the specific needs on case-to-case basis.

III. There is no need for fixing separate criteria for regular and competitive examinations.

3/7

IV. The facility of Scribe/Reader/Lab Assistant should be allowed to any person with benchmark disability as defined under section 2(r) of the RPwD Act, 2016 and has limitation in writing including that of speed if so desired by him/her.

In case of persons with benchmark disabilities in the category of blindness, locomotor disability (both arm affected-BA) and cerebral palsy, the facility of scribe/reader/lab assistant shall be given, if so desired by the person.

In case of other category of persons with benchmark disabilities, the provision of scribe/reader/lab assistant can be allowed on production of a certificate to the effect that the person concerned has physical limitation to write, and scribe is essential to write examination on his behalf, from the Chief Medical Officer/Civil Surgeon/ Medical Superintendent of a Government health care institution as per proforma at **APPENDIX-I.**

V. The candidate should have the discretion of opting for his own scribe/reader/lab assistant or request the Examination Body for the same. The examining body may also identify the scribe/ reader/lab assistant to make panels at the District/Division/ State level as per the requirements of the examination. In such instances the candidates should be allowed to meet the scribe **two days** before the examination so that the candidates get a chance to check and verify whether the scribe is suitable or not.

VI. In case the examining body provides the scribe/reader/lab assistant, it shall be ensured that qualification of the scribe should not be more than the minimum qualification criteria of the examination. However, the qualification of the scribe/reader should always be matriculate or above.

In case the candidate is allowed to bring his own scribe, the qualification of the scribe should be one step below the qualification of the candidate taking examination. The persons with benchmark disabilities opting for own scribe/reader should submit details of the own scribe as per proforma at **APPENDIX-II**

VII. There should also be flexibility in accommodating any change in scribe/reader/lab assistant in case of emergency. The candidates should also be allowed to take more than one scribe/reader for writing different papers especially for languages. However, there can be only one scribe per subject.

VIII. Persons with benchmark disabilities should be given, as far as possible, the option of choosing the mode for taking the examinations i.e. in Braille or in the computer or in large print or even by recording the answers as the examining bodies

can easily make use of technology to convert question paper in large prints, e-text, or Braille and can also convert Braille text in English or regional languages.

IX. In case, the persons with benchmark disabilities are allowed to take examination on computer system, they should be allowed to check the computer system one day in advance so that the problems, if any in the software/system could be rectified. Use of own computer/laptop should not be allowed for taking examination. However, enabling accessories for the computer based examinations such as keyboard, customized mouse etc should be allowed.

X. The procedure of availing the facility of scribe should be simplified and the necessary details should be recorded at the time of filling up of the forms. Thereafter, the examining body should ensure availability of question papers in the format opted by the candidate as well as suitable seating arrangement for giving examination.

XI. The disability certificate issued by the competent medical authority at any place should be accepted across the country.

XII. The word "extra time or additional time" that is being currently used should be changed to "compensatory time" and the same should not be less than 20 minutes per hour of examination for persons who are allowed use of scribe/reader/lab assistant. All the candidates with benchmark disability not availing the facility of scribe may be allowed additional time of minimum of one hour for examination of 3 hours duration. In case the duration of the examination is less than an hour, then the duration of additional time should be allowed on pro-rata basis. Additional time should not be less than 5 minutes and should be in the multiple of 5.

XIII. The candidates should be allowed to use assistive devices like talking calculator (in cases where calculators are allowed for giving exams), tailor frame, Braille slate, abacus, geometry kit, Braille measuring tape and augmentative communication devices like communication chart and electronic devices.

XIV. Proper seating arrangement (preferably on the ground floor) should be made prior to the commencement of examination to avoid confusion or distraction during the day of the exam. The time of giving the question papers should be marked accurately and timely supply of supplementary papers should be ensured.

XV. As far as possible, the examining body should also provide reading material in Braille or E-Text or on computers having suitable screen reading software for open book examination. Similarly online examination should be in accessible format i.e. websites, question papers and all other study material should be accessible as per the international standards laid down in this regard.

XVI. Alternative objective questions in lieu of descriptive questions should be provided for Hearing-Impaired persons, in addition to the existing policy of giving alternative questions in lieu of questions requiring visual inputs, for persons with Visual Impairment.

XVII. As far as possible the examination for persons with disabilities should be held at the ground floor. The examination centres should be accessible for persons with disabilities.

2. It is requested to ensure that the above guidelines are scrupulously followed while conducting examination for persons with benchmark disabilities. All the recruitment agencies, Academics/Examination Bodies etc. under the administrative control of each Ministry/Deapartment may be advised appropriately to ensure compliance of implementing these guidelines. Action taken in this regard may be intimated to this office.

3. The above guidelines are issued with the approval of Hon'ble Minister (Social Justice & Empowerment).

Yours faithfully,

(D.K. Pannda)
Under Secretary to the Government of India
Tele. No. 24369059

To

1. Secretary of all Ministries/Department.

2. Secretary, UPSC, Shahjahan Road, New Delhi.

3. Chairman, SSC, Block No.12, CGO Complex, Lodhi Road, New Delhi-110003.

4. Chairman, University Grants Commission with a request to issue necessary instructions to all universities including Deemed Universities for compliance.

5. Chairman, Railway Board

6. All National Institutes and RCI under administrative control of Department of Empowerment of Persons with Disabilities (Divyangjan), Ministry of SJ&E, New Delhi.

**Copy for information to:** CCPD, Sarojini Bhawan, Bhagwan Dass Road, New Delhi

6/7

APPENDIX- I

## Certificate regarding physical limitation in an examinee to write

This is to certify that, I have examined Mr/Ms/Mrs ______________________ (name of the candidate with disability), a person with ____________________ (nature and percentage of disability as mentioned in the certificate of disability), S/o/D/o ______________________, a resident of ________________________________ (Village/District/State) and to state that he/she has physical limitation which hampers his/her writing capabilities owing to his/her disability.

Signature

Chief Medical Officer/Civil Surgeon/ Medical Superintendent of a Government health care institution

---

Name & Designation.

Name of Government Hospital/Health Care Centre with Seal

Place:

Date:

**Note:**

Certificate should be given by a specialist of the relevant stream/disability (eg. Visual impairment – Ophthalmologist, Lcomotor disability – Prthopaedic specialist/PMR).

APPENDIX- II

## Letter of Undertaking for Using Own Scribe

I ________________________, a candidate with ____________ (name of the disability) appearing for the ________________ (name of the examination) bearing Roll No. __________________ at _______________________ (name of the centre) in the District __________________________, ________________ (name of the State). My qualification is _______________.

I do hereby state that ___________________ (name of the scribe) will provide the service of scribe/reader/lab assistant for the undersigned for taking the aforesaid examination.

I do hereby undertake that his qualification is __________________. In case, subsequently it is found that his qualification is not as declared by the undersigned and is beyond my qualification, I shall forfeit my right to the post and claims relating thereto.

(Signature of the candidate with Disability)

Place:

Date:

## SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY

*(Formerly University of Pune)*

### IMPORTANT INSTRUCTIONS

| | |
|---|---|
| 1 | The external students should follow the instructions issued separately regarding filling of the examination form. **Before filling the examination forms they should ensure, that he/she offers subject/s for which teaching is provided in the affiliated colleges for relevant degree course/s.** |
| 2 | **A)** If the last date of filling the examination forms falls on Holiday/Bank Holiday or any other holiday, the examination forms will be submitted on the next working day.<br>**B)** The Examination forms be validated & inward be done by the college within stipulated time limit. Inward facility be started from first day of submission of form by the student<br>**C)** The Exam fees should be deposited in the bank within 3 days after the expiry of the each last date. |
| 3 | Exam forms will be accepted only up to last date with late fee. **Please note that after last date with late fee no forms will be accepted.** |
| 4 | All the title of the papers may appear in the examination programme. However the question paper will be set only of those papers for which the teaching is provided in the affiliated colleges/recognized institutes/University Departments. |
| 5 | Post Graduate Departmental Examinations will be conducted by the Principals of affiliated colleges having P.G. Centers/Heads of the University Departments and Director of Recognized Institutes in such a way that, the marks of the Examinations and Departmental Courses are submitted to the University on or before the commencement of the respective examinations. No relaxation will be given in this regard. |
| 6 | The Departmental Courses and Term End Examination should be arranged by the Colleges / Departments / Institutes in such a way so that it should not clash with the dates of the University examinations. |
| 7 | All Departments of University and the courses conducted under circular No. 125 have to declare the results of every examination conducted by them within 30 days from the last date of examinations of per course. |
| 8 | **For Handicapped, Blind and Learning Disabled Students:**<br>The Senior Supervisors/Principal/Director of the concerned examination centre is authorized to make the appointment of a writer at an examination for Handicapped, Blind and Learning Disabled Students. The writer to be appointed must not have passed the examination at which he is appointed to work for the examination. The concerned writer should not be first relative with Examinee, i.e. Mother-Father, Sister-Brother, Paternal and Maternal Uncle. And also authorized to sanction additional **Twenty minutes for per one-hour question paper** to handicapped, blind and learning disable students. However, students will have to submit the medical certificate of endorsing Civil Surgeon. An application of the student must be received through the Principal/Director to the Senior **Supervisor concerned. Answer**-Scripts of learning disabled students be submitted to CAP Centre in separate envelop. |
| 9 | The Senior Supervisors/ Principal/Director of the concerned examination centre is authorized, to make the appointment of a writer at an examination for a candidate who, in their opinion, is unable to write answer-scripts on medical grounds. The writer to be appointed, must not have passed the examination at which he is appointed to work for the examination. The concerned writer should not be first relative with Examinee, i.e. Mother-Father, Sister-Brother, Paternal and Maternal Uncle. The concerned Examinee must submit medical certificate from 'Registered Medical practitioner'. **The Senior Supervisor shall make a separate seating arrangement for the candidate and the writer.** |
| 10 | The Principals of all Affiliated Colleges/Directors of the Recognized Institutes/Heads of the University Teaching Departments are requested to follow the procedure laid down by the Finance Department of the Savitribai Phule Pune University from time to time, for the purpose of following the procedure for filling the examination forms. |
| 11 | They are further requested to ensure that the examination forms are retained at the college and furnished for verification to University office as and when asked. |

**Note:** The Principals of all affiliated colleges/Directors of Recognized Institutes/Heads of the University Departments are also requested to bring the contents of this Circular to the notice of students, Teachers and all other concerned.

Exam Coordination/ 748

Dated 20/09/2025

Prof. (Dr.) Prabhakar Desai
Officiating Director
Board of Examinations & Evaluation